

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)

## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY

NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.

Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## Director Board of Examinations and Evaluation


Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520
Website: www.srtmun.ac.in
E-mail: srtmuncoe@gmail.com


संदर्भ परीक्षा / दीक्षांत / २०१७–१८ / 3090

दिनांक १० / ०८ / २०१७

पदवी प्रमाणपत्राच्या द्वितीय प्रतीसाठीचे सुधारीत शुल्क लागू करणे बाबत

### परिपत्रक

या परिपत्रकान्वये सर्व संलग्नीत महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठ संकुलाचे संचालक, उपकेंद्र संचालक, प्राचार्य न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांना कळविण्यात येते की, दिनांक २५/७/२०१७ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील विषय क्र.२२/४१–२०१७ नुसार पदवी प्रमाणपत्राच्या द्वितीय प्रतीसाठीचे शुल्क खालील प्रमाणे सुधारीत करण्यात आलेले आहेत.

अ) विद्यार्थ्यांना देण्यात आलेले मूळ पदवी प्रमाणपत्र खराब झालेले असल्यास जसे की, जळालेले, फाटणे, वाळवी लागणे, नावात बदल निकालात बदल ई. कारणामुळे द्वितीय प्रतीची मागणी केल्यास मूळ प्रमाणपत्र जमा करुन पदवी प्रमाणपत्राची द्वितीय प्रत देण्यात येईल. त्यासाठी रु.५००/–(रुपये पाचशे) एवढे शुल्क आकारले जाईल. सदर पदवी प्रमाणपत्राची सुधारीत प्रत दिल्यास त्यावर Duplicate लिहले जाणार नाही.

ब) तसेच पदवी प्रमाणपत्राची मूळप्रत गहाळ झालेली असल्यास किंवा हरवलेले असल्यास द्वितीय प्रतीसाठी रु.१०००/–(एक हजार रुपये)शुल्क आकारण्यात येईल त्यावर Duplicate असे नोंद करण्यात येईल. यासाठी आवश्यक असलेल्या बाबी खालील प्रमाणे आहेत.

१. विहित नमुन्यातील अर्ज
२. पदवी प्रमाणपत्र हरवल्याबाबत पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेला प्रथम माहिती अहवाल (FIR)
३. वर्तमानपत्रात दिलेली जाहिरात अर्ज
४. रु.१००/–(शंभर रुपये) चा स्टॅप पेपरवरील शपथपत्र
५. सर्व गुणपत्रिकेच्या साक्षांकीत प्रती

उपरोक्त प्रमाणे पदवी प्रमाणपत्राचे दुय्यम व द्वितीय प्रतीचे शुल्क दिनांक १६/८/२०१७ पासून लागू राहील. याची नोंद घ्यावी व ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणुन द्यावी.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत

१. मा. कुलगुरु, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्र–कुलगुरु, प्रस्तुत विद्यापीठ
३. वित्त व लेखाधिकारी, वित्त व लेखाविभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
४. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
५. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.
६. उपकुलसचिव, शैक्षणिक संलग्नीकरण व अभ्यास मंडळे, प्रस्तुत विद्यापीठ.
७. सहायक कुलसचिव, निवडणूक व सभा व दप्तर विभाग यांना विद्या परिषद बैठकीतील ठरावाप्रमाणे कार्यवाहीचा अहवाल.
८. अधीक्षक, विज्ञान व कला विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.

Scanned by CamScanner